महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३४ वा | दिनांक : १९/०२/२०२५ | वार : बुधवार

## हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वीकारली कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे



**मुंबई :** महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज टिळक भवन इथे चार्ज घेतला. या प्रसंगी राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला, ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक, मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधी मंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे उपस्थित होते.कॉंग्रेसमधील अनेक मोठ्या नेत्यांची नावे चर्चेत असताना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांना प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांचे नाव समोर आल्यानंतर अनेकांचे डोळे मोठे झाले होते. इतकेच नाही तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील याबाबत आश्चर्य व्यक्त केल्याचे पाहायला मिळाले. त्यांच्या निवडीमुळे पक्षातील काही वरीष्ठ नेते नाराज असल्याचे देखील सांगितले जात आहे. त्यामुळे आजच्या समारंभाला अनेक मोठ्या नेत्यांनी दांडी मारली.तर मला वैयक्तिक काम असल्यामुळे मी समारंभाला उपस्थित नसल्याचे कॉंग्रेसचे नेते नितीन राऊत यांनी म्हटले आहे.हर्षवर्धन सपकाळ यांनी या आधी बुलढाणा मतदार संघाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सचिव म्हणून देखील त्यांनी काम केले आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी अनेक वर्ष राष्ट्रीय स्तरावर काम केले आहे. पक्षाचे उपाध्यक्ष असताना राहुल गांधी यांनी स्थापन केलेल्या कार्यगटाचेसुद्धा ते सदस्य होते. राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. उत्तराखंड आणि पंजाबसह अनेक राज्यांच्या निवडणुकीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हर्षवर्धन सपकाळ हे कॉंग्रेस विधिमंडळ पातळी वरसुद्धा अभ्यासू आणि आक्रमक आमदार म्हणून परिचित आहेत.

एनएसयुआय, युवक कॉंग्रेसच्या माध्यमातून हर्षवर्धन सपकाळ विद्यार्थी, युवक चळवळीत सक्रीय होते. कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक यांच्या माध्यमातून ते कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या थेट संपर्कात आले. त्यानंतर वऱ्हाडासह संपूर्ण राज्यात युवक कॉंग्रेसची मजबूत बांधणीत सपकाळ यांची भुमिका महत्वपूर्ण राहिली. त्यामुळे राहुल गांधी ब्रिगेडमध्ये महाराष्ट्रातील खासदार राजीव सातव आणि हर्षवर्धन सपकाळ यांची वर्णी लागली होती. जिल्हा परिषदेचे सदस्य, अध्यक्ष, आमदार, अखिल भारतीय कॉंग्रेसचे सचिव ते पक्षाचे अखिल भारतीय पंचायत राज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पदापर्यंत त्यांनी काम केले आहे. त्यामुळे राहुल गांधी यांच्या 'गुड बुक' मध्ये सपकाळ असल्याचे मानले जाते.

## डबल महाराष्ट्र केसरी उपोषणाच्या आखाड्यात



**सांगली :** कुस्तीचा आखाडा गाजवणाऱ्या डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी राज्यात एकच महाराष्ट्र केसरी स्पर्धा घेण्याची मागणी करत सांगलीत एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या या गांधीगिरीची राज्यभरात चर्चा होत आहे.

चंद्रहार पाटील आपल्या उपोषणाविषयी बोलताना म्हणाले की, कुस्ती क्षेत्रात पैलवानांवर होणारा अन्याय स्पष्टपणे दिसत आहे. कुस्ती क्षेत्राला व पैलवानांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले प्राण गेले तरी चालतील. पण त्यासाठी मी लढतच राहणार. कुस्तीत होणारे राजकारण थांबले पाहिजे. अन्यथा पैलवानांची नवी पीढी तयार होणार नाही. चंद्रहार पाटील यांनी यावेळी एक राज्य एक खेळ एक संघटना ही संकल्पना राबवण्याची मागणी राज्य सरकारकडे केली.

चंद्रहार पाटील पुढे म्हणाले, महाराष्ट्रात आज कुस्तीकडे एक पारंपरिक खेळ म्हणून पाहिले जाते. पण दुर्दैवाने आज याच कुस्तीची वाताहात होत आहे. या विरोधात मी आज सांगली जिल्हाधिकारी कार्यालयापुढे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करत आहे. आजवर ज्या स्पर्धा झाल्या त्यात सलग स्पर्धा होत आहते. यंदाच्या वर्षी तब्बल ४ महाराष्ट्र केसरी स्पर्धा होत आहेत. माझा याला विरोध आहे. राज्यात केवळ एकदाच महाराष्ट्र केसरी स्पर्धा झाली पाहिजे. ही माझी प्रमुख मागणी आहे.

या प्रकरणी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना भेटून निवेदन देणार आहे. सरकारने माझ्या मागणीचा सकारात्मक विचार केला नाही तर आमची मंत्रालयावर धडक मोर्चा काढण्याचा इरादा आहे.

कुस्ती ही आपली जुनी संस्कृती आहे. पण एकाच वर्षात चार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा होत असताना शासन त्याकडे का लक्ष्य देत नाही? २०२५ मध्ये फेब्रुवारी महिन्यात एक स्पर्धा झाली. आता दुसरी आता मार्च महिन्यात होत आहे. इतर दोन स्पर्धा या वर्षाअखेरीस डिसेंबर महिन्यात होईल. म्हणजे एका वर्षात चार महाराष्ट्र केसरी स्पर्धा होत आहेत. वर्षातून ४ वेळा अशा स्पर्धा घेणे चुकीचे आहे. या प्रकरणी संघटनात्मक राजकारण दूर करून या स्पर्धेचे होणारे अवमूल्यन थांबवण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

## मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी सरचिटणीस मधुकरअण्णा मुळे यांचे दु:खद निधन



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी सरचिटणीस, मराठवाडा साहित्य परिषदेचे विश्वस्त, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सदस्य तथा प्रसिद्ध उद्योगपती मधुकरअण्णा मुळे यांचे मंगळवारी प्रदिर्घ आजाराने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. गरीब विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी कायम तत्पर असणारे मुळे हे शैक्षणिक क्षेत्रात अण्णा म्हणून ओळखले जायचे.

मधुकरअण्णा मुळे यांना त्यांच्या सामाजिक उपक्रमांसाठी आणि महाराष्ट्रातील शेतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून अनेक पुरस्कार मिळालेत. ते ग्रीन गोल्ड सीड्सचे संस्थापक अध्यक्ष देखील होते. मराठवाडा साहित्य परिषदेचे मधुकर अण्णा मुळे हे विश्वस्त मंडळाचे चेअरमन होते. त्यांचाच काळात यशवंतराव चव्हाण नाट्यगृह झाले. त्यांनी यासाठी शरद पवारांच्या मदतीने मसापला निधी मिळवून दिला. १९८८ ते २०१३ पर्यंत मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस होते.

मधुकरअण्णा मुळे यांच्या काळात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची भरभराट झाली. त्यांच्याच कार्यकाळात ७७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन देवगिरी महाविद्यालयात पार पडले. यावेळी मुळे हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. २००९ साली MSPM चा सुवर्णमहोत्सव तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते देवगिरी महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. यावेळी देखील अण्णा मुळे स्वागताध्यक्ष होते.

११ वे जागतिक मराठी साहित्य संमेलन 'शोध मराठी मनाचा' २०११ साली पार पडले. त्या कार्यक्रमाचेही स्वागताध्यक्ष म्हणून अण्णा यांनी काम पाहिले. महाराष्ट्राची सिंहावलोकन परिषद पार पडली त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची उपस्थिती लाभली होती. अण्णा मुळे यांनी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे स्वतंत्र साहित्य संमेलनही सुरू केले होते.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळातल्या शिक्षक कर्मचाऱ्यांचे जे काही पुस्तक प्रकाशित झाले त्याचा संपूर्ण खर्च हा मंडळाने केला होता. तसेच 'आशय' नामक त्रैमासिकही त्यांनी सुरू केले होते. अण्णा मुळे यांच्या कार्यकाळातत महाराष्ट्र शासनाचा MSPM ला उत्कृष्ट शिक्षण पुरस्कार मिळाला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ फेब्रुवारी २०२५


## बोहल्यावर चढण्याअगोदर वधू-वरांच्या हस्ते केले ग्रंथ प्रकाशन



**कन्नड (अरुण थोरात):** पिशोर ता. कन्नड येथील प्रसिध्द लेखक, व्याख्याते डॉ. संजय गायकवाड लिखित 'स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज' पुस्तकाचे आगळ्या-वेगळ्या पध्दतीने प्रकाशन करण्यात आले. वाचनापासून आज विद्यार्थी आणि समाज दूर जात आहे. वाचना शिवाय तरणोपाय नाही. वाचन संस्कृती अगदी समाजाच्या सामान्यातील सामान्य घटकापर्यंत पोहोचण्यासाठी बोहल्यावर चढण्यापूर्वी चि. गोरख आणि चि. सौ. का. कोमल ह्या वधु-वरांच्या हस्ते 'स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज' (आवृत्ती तिसरी) या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. पुणे स्थित जिजाई प्रकाशनच्या वतीने हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. कोटनांद्रा, ता. सिल्लोड येथे गायकवाड परिवार, पिंपरखेडा आणि निकम परिवार, कोटनांद्रा या परिवारात हा विवाह सोहळा संपन्न झाला.

यावसंगी प्राचार्य तथा भाजपा तालुकाप्रमुख अशोक दादा गरुड, छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे, लेखक डॉ. संजय गायकवाड, मनोहर गायकवाड, जगन गायकवाड, सुभाष निकम, दिनकर खरात, के वाय झोंड पाटील, संजय निकम, रायभान जाधव, के.वा. झोंड, देविदास खरात आदींसह मोठ्या प्रमाणात वऱ्हाडी मंडळी उपस्थित होती."शहाजी महाराजांची ओळख ही फक्त छत्रपती शिवरायांचे वडील अशी नाही. ते महापराक्रमी होते. महाबाहू होते. ते स्वतंत्र दरबार भरवत असत. त्यांनी तब्बल तीन वेळेस स्वतंत्र राज्य स्थापन केले होते. त्यामुळेच ते 'स्वराज्य संकल्पक' ठरतात. शहाजी महाराजांची ही ओळख सर्वसामान्यांना व्हावी हा उद्देश मनी धरून या पुस्तकाचे लेखन केले आहे", असे लेखक तथा व्याख्याते डॉ. संजय गायकवाड यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केले. लग्न विधीचा श्रीगणेशा पुस्तक विमोचन करून झाल्याने हा विषय परिसरात कौतुकाचा विषय झाला आहे.




## बंगळुरू येथे आंतरराष्ट्रीय नाटय महोत्सवात ययाति नाटकाचे विशेष सादरीकरण



**छत्रपती संभाजीनगर :** ०१ ते ०८ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय नाटय महोत्सवात रशिया, श्रीलंका, हैदराबाद, दिल्ली सहित मराठवाड्यातील कलाकारांचा सहभाग असलेले नाट्यशास्त्र विभागाचे "ययाति" हे नाटक दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी बंगळूरू येथे कलाग्राम सभागृहात कर्नाटक येथील अनेक दिग्गज रंगकर्मींच्या उपस्थितीत सादर झाले असुन त्या बद्दल नाट्यशास्त्र विभागावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. प्रख्यात रंगकर्मी गिरीश कर्नाड यांचे प्रसिद्ध नाटक 'ययाति' या नाटकाचे दिग्दर्शन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नाट्यशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी, प्रा. असलम युनूस यांनी केले असून दिग्दर्शनाबरोबरच त्यांनी या नाटकात "ययाति " ही मध्यवर्ती भूमिका देखील साकारली आहे हे विशेष. राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्लीच्या गेल्या २५ वर्षांपासून दरवर्षी होणाऱ्या भारंगम (भारतीय रंग महोत्सव) या आंतरराष्ट्रीय महोत्सवात "ययाति" हे सादर झाले असून देश - परदेशातील सर्वोत्कृष्ट नाट्य महोत्सवांपैकी हा महोत्सव एक मानला जातो. ०१ फेब्रुवारी २०२५ पासुन देश विदेशातील १३ केंद्रावर सूरू असलेल्या या महोत्सवात जगभरातील अनेक भाषांमधील अनेक नाटके सादर झाली असुन १६ फेब्रुवारीला या महोत्सवाचा समारोप झाला आहे. या वर्षी संपुर्ण देशातील नाटय संघांबरोबरच रशिया, , तैवान, श्रीलंका, पोलंड, ऑस्ट्रिया, झेक रिपब्लिक आणि जर्मनी इत्यादि देशांतील कलाकारांचाही 'भारंगम" मध्ये सहभाग आहे हे विशेष . सातत्याने देश-विदेशातील नाट्य कलाकारांना एकत्र आणण्याचे कार्य या निमित्ताने राष्ट्रीय नाट्य विद्यालय दिल्ली करत असते.

या नाटकातील सहभागी कलावंत नाट्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील. आजी -माजी विद्यार्थी आणि प्राध्यापक आहेत हे विशेष. नाट्यशास्त्र विभागाचे 'ययाति' नाटक "भारंगम" (भारत रंग महोत्सव) महोत्सवात बंगरुळू या ठिकाणी कलाग्राम या सभागृहात झाले असून सातत्य आणि सांघिक अविष्कारामुळे हे शक्य झाले असल्याचे विभागप्रमुख डॉ.वैशाली बोदिले यांनी सांगितले. नाट्यशास्त्र विभाग आणि एकूणच मराठवाड्याच्या रंगभूमीसाठी ही मोठी उपलब्धी असल्याचे प्रा. गजानन दांडगे यांनी सांगितले.कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी "ययाति" टीमचे कौतुक केले असून विभाग प्रमुख डॉ. वैशाली बोदिले, प्रा. स्मिता साबळे व प्रा. गजानन दांडगे यांनी मार्गदर्शन केले आहे.

ययाति नाटकातील सहभागी कलावंत : सैनिक - ऋषिकेश कारके, पांडुरंग शिंगारे, किशोर थोरात, गाणार वाल्मीक , औदुंबर वानखेडेपुरू - शुभम कोल्हे, चित्रलेखा - प्रेरणा खरात, स्वर्णलता - पूजा पवार,शर्मिष्ठा - विशाखा शिरवाडकर, देवयानी - उल्का कुलकर्णी आणि ययाति - असलम युनूस या कलाकारांनी अभिनय केला आहे. तर तांत्रिक बाबी नेपथ्य रामेश्वर देवरे, प्रा. गजानन दांडगे ,संगीत विनोद आघाव, रोहिदास सोमवंशी, आदित्य इंगळे,रोहन गहिरे ,नृत्य दिग्दर्शन - व्ही. सौम्यश्री प्रकाश योजना वाल्मीक जाधव, रंगभूषा - भाग्यरवी कुलकर्णी, वेशभूषा- कविता दिवेकर, रंगमंच व्यवस्थापक - भूषण खोडके , विपुल भोले, सलमान शेख, राहिल बागवान आणि दिग्दर्शक - असलम युनूस

## दुसऱ्यांदा गुन्हा केला तर कडक कारवाई होईल - पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत

**बीड :** बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत ॲक्शन मोडवर आले आहेत. नवनीत कॉवत यांनी हत्येचा प्रयत्न करणाऱ्या जिल्ह्यातील जवळपास दीडशे आरोपींना तंबी दिली आहे. या सर्व आरोपींना पोलिस अधिक्षक कार्यालयात बोलावण्यात आले होते. यावेळी नवनीत कॉवत यांनी दुसऱ्यांदा गुन्हा करू नका, अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा थेट इशाराच दिला आहे.

पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी यापूर्वी वाळू माफियांना इशारा दिला होता. त्यानंतर त्यांनी कुख्यात गुन्हेगारांना तंबी दिली आणि आता हत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना देखील कारवाईचा इशारा दिला आहे. दुसऱ्यांदा गुन्हा केला तर कारवाईला समोरे जावे लागेल असा इशारा नवनीत कॉवत यांनी या गुन्हेगारांना दिला आहे.

दरम्यान, आता बीड जिल्हा कारागृहाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे. याच कारागृहात संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडला कोठडीत ठेवण्यात आले आहे. देशमुख हत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या एसआयटीने बीड जिल्हा कारागृहाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याच अनुषंगाने सोमवारी पोलिस अधीक्षकांच्या टीमने या संदर्भात आढावा घेतला आहे. दहा ते बारा बाबींवर कारागृहाचे ऑडिट होणार आहे. बीड जिल्हा कारागृह निजामकालीन असून इमारत कमकुवत आहे. कारागृहातील सीसीटीव्हीचे नूतनीकरण करायचे आहे. त्याबरोबरच सुरक्षा यंत्रणा देखील अद्यावत गरजेचे असल्याचे म्हटले आहे.

बीड जिल्ह्यातील मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत. यावर मंत्री पंकज भोयर यांना विचारले असता या प्रकरणातील जवळजवळ सर्व आरोपींना अटक झालेली असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. तर या प्रकरणावर गृह विभाग अत्यंत गंभीर असून योग्य पद्धतीने चौकशी सुरू आहे. अशी प्रतिक्रिया मंत्री भोयर यांनी दिली.

## स्नेहसंमेलनातून भारतीय संस्कृती, परंपरेचे दर्शन - डॉ. किरण कुवर




**धुळे :** जीवनात ध्येय प्राप्तीसाठी सातत्य राखावे जीवनात ध्येय निश्चित करा व बेभान होऊन ध्येय प्राप्त करा. सोशल मीडियामुळे मुलांच्या संस्कारावर आघात होत असून त्यापासून दूर राहण्याचा संदेश त्यांनी दिला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीची पुस्तके पालकांसमवेत वाचावीत यातून ज्ञानवृद्धी होते असे प्रतिपादन माध्यमिक शिक्षणअधिकारी धुळे डॉ. किरण कुवर यांनी केले.

निजामपूर - जैताणे ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित श्रीमती भानुबेन वाणी पब्लिक स्कूल आणि श्रीमती आशुमतीबेन चं. शाह विद्यालयाच्या स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या सुरुवातीला म्हसाई मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले सदर कार्यक्रमाचे उद्घाटक माध्यमिक शिक्षणअधिकारी धुळे डॉ. किरण कुवर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि. प. अध्यक्ष शिवाजीराव दहिते होते. प्रमुख अतिथी उद्योगपती ओमप्रकाश अग्रवाल धुळे, जिल्हा पतसंस्था फेडरेशन गटनेते गोपाळराव केले, रोटरी नागरिक सहकारी पतसंस्था मर्या. दोंडाईचा चेअरमन सुरेश जैन, नगरपंचायत साक्री उपनगराध्यक्ष बापूसाहेब गीते, साक्री तालुका मराठी पत्रकार संघ अध्यक्ष विजय भोसले, गटशिक्षण अधिकारी राजेंद्र पगारे, सरपंच ग्रामपंचायत भामेर मनोज सोनवणे, सरपंच ग्रामपंचायत निजामपूर शितल गजानन शाह, सरपंच ग्रामपंचायत जैताणे कविता अशोक मुजगे, सेवा निवृत्त प्राचार्य नरेंद्र तोरवणे, निजामपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मयूर भामरे, संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शाह, उपाध्यक्ष दुल्लभ जाधव, सचिव सुमंतकुमार शाह, विश्वस्त भिकनलाल जयस्वाल, वासुदेव बदामे, योगिता शाह, ललित आरूजा, मुख्याध्यापक डॉ. मनोज भागवत, मुख्याध्यापक पी. झेड. कुवर, माजी सरपंच सलीम पठाण, युसुफ सय्यद, राजेंद्र शाह, साक्री नगरपंचायतीच्या नगरसेवक जयश्री पगारिया, सामाजिक कार्यकर्ते विनोद पगारिया, नितीन साळुंखे, भामेर ग्रामपंचायत उपसरपंच गोकुळ थोरात, भामेर ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र सोनवणे, जिभाऊ तुकाराम वाघ, प्रदीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शाह यांनी शालेय जीवन हा आयुष्याचा पाया आहे. शालेय स्नेहसंमेलनातील आठवणी कायम स्मरणात राहतात शिक्षक व पालक हा मुलांच्या जीवनाचा पाया मजबूत करतात त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले आयुष्यात आपल्या शिक्षकांचे व पालकांचे मार्गदर्शन घेऊन आयुष्यात पुढे जावे असे आवाहन केले. त्याचबरोबर लक्ष्मीकांत शाह यांनी भामेर ग्रामपंचायत सरपंच मनोज सोनवणे यांचे अनमोल सहकार्य म्हसाई माता मंदीर परिसर विकासासाठी लाभते म्हणुन आभार मानलेत. सदर कार्यक्रमात श्रीमती भानुबेन वाणी ट्रस्ट मुंबई यांच्या विश्वस्त रूपाली शाह यांनी ऑनलाईन उपस्थित देऊन शाळेला ३००००० ₹ लक्ष रुपयाची देणगी दिली. रजनी केमिकल कंपनी मुंबई यांनी १५१००० ₹ हजार, रुपये देणगी दिली. त्याच बरोबर उद्योगपती ओमप्रकाश अग्रवाल यांनी ५१००० ₹ रुपये देणगी दिली. स्नेहसंमेलन कार्यक्रमात नरेंद्र तोरवणे निजामपूर पोलीस ठाण्याचे एपीआय मयूर भामरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पी. झेड. कुवर तर सूत्रसंचालन मुख्याध्यापक डॉ. मनोज भागवत यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाषण शिवाजीराव दहिते यांनी केले.

स्नेहसंमेलन कार्यक्रम यशस्वीतेसाठी ललित सोनवणे, नितीन वाघ, निखिल तोरवणे, हर्षदा राणे, हर्षाली ढोढरे, दिपाली देवरे, राकेश ठाकरे, रूपाली मोहिते, जागृती वाडीले, जयश्री मोरे, प्रसन्न शाह, कांचन पगारे, स्वाती कोठावदे, मनीषा धनगर, अनम पठाण, प्रशांत सावळे, प्रेरणा पाटील, ममता सुतार, जोशना सोलंकी, सचिन सूर्यवंशी, हर्षदा वाघ, शाळेचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद, म्हसाई महिला पतसंस्था जनरल मॅनेजर कर्मचारीवृंद, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे मॅनेजर कर्मचारीवृंद यांचे अनमोल सहकार्य लाभले.

## शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्मनिरपेक्ष राज्य होते - डॉ. नम्रता भोसले




**कन्नड (अरुण थोरात):** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करत असताना विविध तंत्राचा वापर केला. शिवरायांना माणसांची योग्य पारख होती. समाजातील अठरा पगड जातीतील व विविध धर्मातील लोकांना एकत्र घेऊन स्वराज्याची स्थापना केली.

दि. १८ फेब्रुवारी रोजी येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी छत्रपती शिवराय व स्वराज्यनिर्मिती या विषयावर प्रमुख अतिथी म्हणून बोलत असताना डॉ. नम्रता भोसले यांनी स्वराज्याच्या निर्मिती मधील अफझलखान प्रकरण, शाहिस्तेखानावरील हमला, करत लबखाना विरुद्ध उंबरखिंडीतील प्रसंग अशा विविध घटनांमधील बारकावे मांडत असताना महाराजांच्या गनिमी कावा युद्धनितीची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय भोसले हे होते. या प्रसंगी व्यासपिठावर श्री. छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर व डॉ.भाऊसाहेब मगर हे उपस्थित होते.

शिवजयंती महोत्सवाची सुरुवात शोभायात्रेने करण्यात आली. महाविद्यलयीन विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ व वेगवेगळया मावळयांची वेशभूषा धारण करून, लाठी-काठी व तलवार यांचे प्रात्याक्षिक करीत लेझीमच्या तालावर व ढोल ताशाच्या गजरात शोभायात्रा काढली. तसेच शिवजयंती निमित्ताने शिवाजी महाराजांच्या जिवन व कार्यावर आधारित प्रश्नमंजुषा व वकृत्व स्पर्धा घेण्यात आली विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. अध्यक्षीय समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विजय भोसले यांनी विद्यार्थांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचाराचा आदर्श डोळया समोर ठेऊन तशा प्रकारची कृती करावी असे मत मांडले. कार्यक्रमचे प्रास्ताविक डॉ. जगदीश भेलोंडे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. कारभारी भानुसे यांनी केले तर डॉ. प्रकाश महाजन यांनी आभार मानले. याप्रसंगी प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वसईत बारावी बोर्डाच्या परीक्षेत मोठा गैरव्यवहार

**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. या परीक्षांमध्ये अनेक ठिकाणी गैरव्यवहार होत असल्याचे उघडकीस येत आहे. वसई तालुक्यात मोठा गैरव्यवहार झाल्याचे समोर आले आहे. परीक्षेसाठी मित्राला बसवल्याची घटना घडली आहे. वाडा येथील एसपी कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या अरबाज अस्लम कुरेशी याने स्वत:च्या ऐवजी अहमद रजा फयाजउद्दीन खान याला परीक्षेला बसवले असल्याचे उघडकीस आल्यावर एकच खळबळ उडाली आहे.

अरबाज अस्लम कुरेशीचे ओमसाई इंग्लिश हायस्कूल, तुंगारेश्वर येथे त्याचे परीक्षा केंद्र होते. मात्र, ही माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांना मिळताच त्यांनी तत्काळ कारवाई करत आरोपीचा पाठलाग करून परीक्षा केंद्रावरच त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

या प्रकरणी प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, अरबाज कुरेशी याची काही राजकीय नेत्यांशी जवळीक होती. त्याने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर विविध राजकीय नेत्यांसोबतचे फोटो देखील पोस्ट केले होते. त्यामुळे हा प्रकार अधिक गंभीर असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या अशा गैरप्रकारांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ फेब्रुवारी २०२५

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ९५ व्या वैचारीक कार्यशाळेचे आयोजन.

**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** : आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, १९ फेब्रुवारीला बहुजन प्रतिपालक कुळवाडी भुषण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. त्या अनुषंगाने विषय : बहुजन प्रतिपालक कुळवाडी भुषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साम्राज्यातील रयतेचे राज्य : एक आकलन. करिता सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ९५ व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे दिनांक १९ फेब्रुवारी २०२५, बुधवारला जयंतीनिमित्त दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला भटक्या विमुक्तांचे ज्येष्ठ नेते मा. तोतारामजी जाधव उद्घाटनपर मार्गदर्शन करणार असून इंजिनिअर किशोर पाटील यांचे विशेष मार्गदर्शन तर प्रा. डॉ. रामचंद्र काळुंखे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता ९५ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.




## विद्यार्थ्यांनो विज्ञानसोबत अध्यात्माची कास धरा- कृषिभूषण डॉ. एस. जे. जाधव



**कन्नड (अरुण थोरात)** : विद्यार्थ्यांनी विज्ञानासोबत अध्यात्माची कास धरावी. स्पर्धेच्या युगात केवळ गुणांच्या मागे धावन्यावण्यापेक्षा आपल्यातील स्व ओळखून त्या ध्येयाने मार्गक्रमण करावे असे मार्गदर्शन कृषिभूषण डॉ.एस.जे.जाधव यांनी अंधानेर प्रशालेतील विद्यार्थ्यांना केले.मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर सरपंच अशोकराव दाबके,डॉ. सदाशिव पाटील, कैलास मालकर, मुख्याध्यापक राजीव जाधव यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.जाधव म्हणाले की सतत कार्यमग्न रहा, नैतिक मूल्ये जोपासा, भ्रष्टाचारापासून कोसो दूर रहा. विविध विषयांना अलगद हात घालत त्यांनी मुलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान डॉ.एस जे जाधव यांना पोहरादेवी येथे नुकताच समाजरत्न पुरस्कार प्राप्त झाल्याने सरपंच अशोक दाबके यांच्या तसेच प्रशालेच्या वतीने त्यांचा शाल श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. दहावीच्या नूतन बिजारणे रेणुका मालकर, शिफा शेख या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन नववीच्या नूतन शिरसे, नूतन पंडित यांनी केले. प्रास्ताविक संजय केवट यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.सदाशिव पाटील, सरपंच अशोक दाबके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक राजीव जाधव यांनी केले. आभार संजय केवट यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नारायण दांगट, रघुनाथ पाटील, रुपाली सोनवणे, जावेद शेख, दिपक सोनवणे, मीनाक्षी बडग यांसहअष्पाक शेख,अलका गंगोले यांनी परिश्रम घेतले.

## बाळासाहेब पवार वाचनालयात चित्रमय इतिहास प्रदर्शन संपन्न



**कन्नड (अरुण थोरात)**: सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि बाळासाहेब पवार फाउंडेशन यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त चित्रमय इतिहास प्रदर्शनाचे दि. १७ व १८ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. अंबड जिल्हा जालना येथे इतिहास अभ्यासक व संशोधक प्रा. रामभाऊ लांडे यांनी संग्रह केलेल्या चित्रांचे, नाणी आणि ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन लेखक डॉ. रमेश सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरविंद कांबळे होते. प्रदर्शन कर्ते रामभाऊ लांडे,सुरेश चव्हाण, वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, चंद्रशेखर शिंदे, अजित खंबाट, श्रीमती बिन्हारे व श्रीमती देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.इतिहास संशोधक रामभाऊ लांडे यांच्या संग्रहातील छायाचित्रांचा खजिना चित्रप्रदर्शनाच्या रुपाने मिळाला.

यात शिवजयंती तसेच शिवराज्याभिषेकाच्या ३५० वर्ष याचे औचित्य साधून गड किल्ल्यांची दुर्मिळ छायाचित्रे, यासोबत नाणी, ऐतिहासिक कागदपत्रे, दुर्मिळ वस्तू, टपाल तिकीट, विशेष आवरण आदी वस्तूंचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त चित्रमय होळकरशाही प्रदर्शन यात दुर्मिळ छायाचित्रे आणि ऐतिहासिक वस्तू व दुर्मिळ दस्तऐवजांचा समावेश होता.भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उपलब्ध असलेले दुर्मिळ छायाचित्रे, पत्रव्यवहार आदींचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. या प्रदर्शनाचा शहरातील शाळा महाविद्यालय विद्यार्थी तसेच नागरिकांनी मिळून दोन हजार इतिहास प्रेमी नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. प्रदर्शनाच्या यशस्वितेसाठी वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, नरेश सोनवणे, ऋषिकेश शिवदे आदींनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ फेब्रुवारी २०२५


## गृह खात्याच्या निर्णयामुळे शिवसेनेचे २० आमदार नाराज



**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील गृह विभागाने सुरक्षेचा गंभीर धोका नसलेल्या नेत्यांच्या सुरक्षेत कपात केली आहे. यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या २० आमदारांचा समावेश असून, गृह खात्याच्या या निर्णयामुळे हे आमदार नाराज झाल्याची चर्चा आहे.

सत्ताधारी महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात छुपा संघर्ष सुरू असल्याची चर्चा गत काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात रंगली आहे. या पार्श्वभूमीवर उपरोक्त प्रकार घडला आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, फडणवीस यांच्याकडे असणाऱ्या गृह विभागाने राज्यातील सर्वच आमदार व प्रमुख नेत्यांच्या सुरक्षेचा आढावा घेत एक अहवाल सादर केला आहे. या अहवालानुसार सुरक्षेचा गंभीर धोका नसणाऱ्या आमदार व नेत्यांची सुरक्षा कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गृह खात्याच्या या निर्णयाचा फटका सत्ताधारी शिवसेनेच्या २० आमदारांना बसला आहे. यामुळे त्यांच्यात नाराजी पसरली आहे. त्यांनी ही बाब एकनाथ शिंदे यांच्या कानावर टाकल्याचीही चर्चा आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे उद्धव ठाकरे यांच्याशी बंडखोरी केल्यानंतर शिंदेगटाच्या ४० आमदार व १२ खासदारांना सुरक्षा पुरवण्यात आली होती. त्यातील काही आमदारांना वाय दर्जाची सुरक्षा होती. पण आता सुरक्षेचा आढावा घेतल्यानंतर ज्या आमदार व खासदारांच्या सुरक्षेचा धोका पूर्वीपेक्षा कमी झाला आहे, त्यांच्या सुरक्षेत घट करण्यात आली आहे.

गृह खात्याने केवळ शिंदे गटातील नेत्यांच्याच सुरक्षेत कपात केली नाही, तर सरकारने राष्ट्रवादी व भाजपच्या काही बडे नेते व आमदारांचीही सुरक्षा कमी केली आहे.

गृह खात्याच्या या निर्णयामुळे शिंदे गटाचे माजी मंत्री तानाजी सावंत यांचा सरकारी लवाजमा इतिहासजमा झाला आहे. सावंत यांनी मंत्री असताना आपल्या सुरक्षेसाठी ४८ पोलिस कर्मचारी व तीन वाहने नियुक्त करून घेतली होती. पण आता त्यांचे मंत्रिपद गेल्यामुळे त्यांची सुरक्षा काढून घेण्यात आली आहे. आता केवळ एक सुरक्षा रक्षकच त्यांच्या दिमतीला असेल.

मधल्या काळात पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी तानाजी सावंत यांचा फौजफाटा १५ कर्मचाऱ्यांपर्यंत कमी केला होता. पण सावंत यांनी एकनाथ शिंदे यांच्या मार्फत दाव टाकत पुन्हा आपल्या सुरक्षेत वाढ केली होती. पण आता तानाजी सावंत यांची सुरक्षा व्यवस्था काढून त्यांना आमदार म्हणून केवळ एक सुरक्षा रक्षक देण्यात आला आहे.

दुसरीकडे, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या मुद्यावरून सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. मुंबईत एकेकाळी अंडरवर्ल्ड सुरू होते. तसेच अंडरवर्ल्ड मंत्रालयात सुरू आहे. येथे समांतर सरकार चालवण्याचा प्रयत्न सुरू असून, यामुळे राजकीय अराजक निर्माण झाले आहे. एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांचे आदेश न पाळण्याच्या सूचना केल्या आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनी हे मोडून काढले नाही तर राज्य अराजकतेच्या खाली जाईल. हे वेड्यांचे सरकार असून, मंत्रालयात पुरता गोंधळ माजला आहे. गृहनिर्माण खात्यात पैसे दिल्याशिवाय काम होत नाही, असे ते म्हणालेत.

## मौलाना आझाद कॉलेज औरंगाबाद येथे ॲप वापरून पक्षी निरीक्षण आणि ओळख

















**छत्रपती संभाजीनगर :** सलीम अली क्लब, मौलाना आझाद महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागने १७ फेब्रुवारी २०२५ रोजी कॉलेज कॅम्पस येथे सकाळी ८.०० ते ९.०० वाजता पर्यावरण संशोधन फाऊंडेशन आणि एज्युकेशन ॲकॅडमीच्या असोसिएशनमध्ये पक्षी निरीक्षण आणि पक्षी ओळख (पक्षी ध्वनीशास्त्र वापरणे) आयोजित केले.

श्री. कुणाल विभांडिक यांनी विद्यार्थ्यांना पक्ष्यांची संख्या, अधिवास आणि शाश्वत पर्यावरणीय पद्धती यांच्यातील परस्परसंबंधांबद्दल शिक्षण दिले.

विद्यार्थ्यांनी पक्षी ध्वनिक तंत्र आणि दुर्बिणीचा वापर करून २० पक्ष्यांच्या प्रजाती ओळखल्या. पक्षी निरीक्षण कौशल्यांचा विकास:श्री कुणाल विभांडिक यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी दुर्बिणी आणि पक्षी ॲप्ससह पक्षी निरीक्षण तंत्राचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

प्राचार्य डॉ. मजहर अहमद फारुकी यांनी पक्ष्यांच्या अधिवास आणि लोकसंख्येचे संरक्षण करण्यासाठी शाश्वत पद्धतींच्या गरजेवर प्रकाश टाकून या कार्यक्रमाने पर्यावरणविषयक जागरूकता वाढवली.

४० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला, पक्षी संवर्धन आणि पर्यावरण विषयक जागरूकता याविषयी तीव्र स्वारस्य प्रदर्शित केले.

डॉ. जे.डी. शेख, डॉ. तरन्नुम शेख, डॉ. सय्यद अथेरुद्दीन कादरी, डॉ. अशफाक खान, आणि श्री. मोहम्मद मुख्तार शेख यांच्यासह डॉ. आरिफ पठाण (उपप्राचार्य) यांनी पर्यावरण शिक्षण आणि संवर्धनासाठी संस्थेची बांधिलकी दाखवून दिली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ फेब्रुवारी २०२५

# डॉ. पंढरीनाथ रोकडे यांना इंटरनॅशनल इमिनन्स अवार्ड इन फिजिकल एज्युकेशन




क्रीडा क्षेत्रासह, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व साहित्यिक, क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करून देशहितासाठी झटणाऱ्या व लोकसेवेसाठी समर्पित असणाऱ्या देशातील कला-गुण संपन्न प्रतिभावंत व गुणवंत व्यक्तींनाइंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिजिकल एज्युकेशन ,फिटनेस अँड स्पोर्ट्स सायन्स असोसिएशनच्या वतीने हैदराबाद येथील वासवी इंजीनियरिंग महाविद्यालय हैदराबाद येथे आयोजित , इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिजिकल एज्युकेशन फिटनेस अँड स्पोर्ट्स सायन्स असोसिएशन व हैदराबाद येथील उस्मानिया युनिव्हर्सिटीच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रीडा परिषदेत दक्षिण कोरियातील वर्ड सोसायटी ऑफ पीस चे अध्यक्ष डॉ. लि-जोग- यंग व बॉम्बे फिजिकल कल्चर असोसिएशनचे सरचिटणीस सन्माननीय दीपक जी शेटे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले .

या परिषदेत सुमारे 350 भारतीय प्रतिनिधी आणि इतर देशांतील 30 प्रतिनिधींनी भाग घेतला होता. क्रीडा विज्ञानातील क्षेत्रातील साक्षरता विकास बरोबरच शारीरिक शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक, क्रीडा शास्त्रज्ञ, प्रशिक्षक, डॉक्टर आणि इतर सहभागींना या परिषदेत ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिजिकल एज्युकेशन फिटनेस अँड स्पोर्ट्स सायन्स असोसिएशनच्या वतीने गेल्या वीस वर्षापासून हे एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ क्रीडा क्षेत्रातील संशोधकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे या आंतरराष्ट्रीय व्यासपीठाचे प्राथमिक उद्दिष्ट क्रीडा शिक्षण, तंदुरुस्ती, आरोग्य आणि जीवनमानाचा दर्जा वाढवणे आणि प्रोत्साहन देणे हे असून जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी खेळांच्या उपयुक्ततेबद्दल माहितीची देवाणघेवाण या परिषदेत केली जाते. वैयक्तिक तंदुरुस्ती, एकता आणि लिंग समानता वाढविण्यासाठी खेळाचा जागतिक स्तरावर एक व्यासपीठ म्हणून असोसिएशनच्या वतीने उपयोग केला जात आहेत्यात खेळाबरोबरच क्रीडा मानसशास्त्र, तंत्रज्ञान, शारीरिक व्यायाम, पोषण आणि आरोग्य यासह विविध विषयांचा समावेश आहे. प्रोफेसर डॉ. पंढरीनाथ रोकडे यांना त्यांच्याआंतरराष्ट्रीय स्तरावरील शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदाना बद्दल इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिजिकल एज्युकेशन फिटनेस अँड स्पोर्ट्स सायन्स असोसिएशन यांच्यावतीन पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला याप्रसंगी तेलंगणा राज्याचे दारूबंदी आणि उत्पादन शुल्क पर्यटन आणि संस्कृती आणि पुरातत्व मंत्री श्री जुपल्ली कृष्णा राव,दक्षिण कोरियातील वर्ल्ड सोसायटी ऑफ पीसचे अध्यक्ष डॉ. ली जोंग-यंग; बॉम्बे फिजिकल कल्चर असोसिएशनचे सरचिटणीस श्री. दीपक शेटे; मम्माबी; वासावी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.व्ही. रमणा; आणि प्रो. जे. प्रभाकर राव, प्रो. राजेश कुमार, प्रो. एल.बी. लक्ष्मीकांत राठोड, प्रो. बी. सुनील कुमार, डॉ. वाय. इमॅन्युएल, प्रो. के. दीपला आणि जी.व्ही. आदित्य यांच्यासह जगभरातील विविध देशातील क्रीडा क्षेत्रातील प्रतिभावंत उपस्थित होते. " सातत्यपूर्ण संघर्ष व समर्पणाचे फलित म्हणजे आजचा हा पुरस्कार असल्याचे " गौरवोद्गार याप्रसंगी, प्रोफेसर डॉ. रोकडे यांनी काढले

डॉ.रोकडे याच्यातीलअनन्यसाधारण राष्ट्रीय कर्तव्यभाव वृत्तीचा व गुणवत्तेचा गौरव म्हणून हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठाचे प्रोफेसर डॉ.राजेश कुमार व शारीरिक शिक्षण विषयाचे माजी कुलगुरू तथा प्रोफेसर डॉ लक्ष्मीकांत राठोड, प्राचार्य डॉ. घनश्याम ढोकराट, व क्रीडा क्षेत्रातील प्रतिभावंत अनेक मान्यवरांनी प्रोफेसर डॉ पंढरीनाथ रोकडे यांचे अभिनंदन केले आहे डॉ.पंढरीनाथ रोकडे हे मोरेश्वर महाविद्यालयात गेल्या ३० वर्षापासून शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख कार्यरत असून, शारीरिक शिक्षण व क्रीडा विषयात त्यांनी अतुलनीय कार्य केलेले आहे. त्यांची संशोधनामध्ये रुची असून त्यांच्या मार्गदर्शनात आजपर्यंत २१ विद्यार्थ्यांनी पी.एचडी पूर्ण केली असून १७ विद्यार्थी एम.फील उत्तीर्ण झालेले आहेत. त्यांचे शारीरिक शिक्षण व क्रीडा विषयात १७ पुस्तके प्रकाशित असून शंभरहून अधिक राज्य, राष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये त्यांनी सहभाग नोंदविला आहे ५० पेक्षा अधिक त्यांचे संशोधन पेपर आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सादर झालेले असून त्यांनी मलेशिया बँकॉक, कजकिस्तान , रशिया देशांमध्ये अभ्यासदौरे केलेले आहेत त्यांचा ए.पी.आय स्कोर १२८२ असून, छत्रपती संभाजीनगर सह राज्यातील विविध क्रीडा संघटनांमध्ये ते संघटक म्हणून कार्यरत करत आहेत आज तागायत त्यांना विविध राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वीस पेक्षा अधिक पुरस्कार मिळालेले आहेत, नुकतेच शारीरिक शिक्षण विषयात त्यांना Artificial Intelligent Base Physical - Education Training Device.. या संशोधनास भारत सरकार यांचे मार्फत पेटंट दर्जा प्राप्त झाला आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठासह महाराष्ट्र राज्याच्या इतर विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर त्यांनी काम केले असून अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे महाराष्ट्र राज्याचे माजी उपाध्यक्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ शैक्षिक महासंघाचे महासचिव म्हणून त्यांनी भरीव काम केलेले आहे .त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दलमोरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार संतोष पाटील दानवे महाविद्यालयाचे प्राचार्य, व प्राध्यापक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.संदीप जगताप, विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर विजय फुलारे, प्र.कुलगुरु प्रोफेसर डॉ वाल्मीक सरोदे, कुलसचिव प्रोफेसर डॉ. प्रशांत अमृतकर, विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.गजानन सानप यांच्यासह क्रीडा व शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ फेब्रुवारी २०२५

# तरुणांनी छत्रपती शिवरायांच्या कार्याचा आदर्श घ्यावा



१९ फेब्रुवारी १६३० मध्ये पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहराजवळ असलेल्या 'शिवनेरी' या डोंगरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख जगभर व्हावी, त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून १९ फेब्रुवारी रोजी त्यांची जयंती साजरी केली जाते. छत्रपती शिवरायांचे व्यक्तिमत्व दीपस्तंभाप्रमाणे होते ते अनेकांना प्रेरणा स्फूर्ती देणारे आहे. त्यांचा आदर्श आजच्या तरुणांनी, राज्यकर्त्यांनी डोळ्यासमोर ठेवून आपण प्रत्येकानं आपल्या जीवनात कार्य करायला हवे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाहीविरुद्ध व मोगलशाहीविरुद्ध संघर्ष करून आपले राज्य स्थापन केले होते. कुठल्याही जाती धर्माच्या विरोधामध्ये त्यांची भूमिका नव्हती. आज जे त्यांच्या बाबतीत म्हणजेच मुस्लिमांच्या बाबतीमध्ये इतिहासामध्ये चित्र रंगवले जाते ते तसे नव्हते. म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज हे मुस्लिमांच्या विरोधात नव्हते. ते सर्व जातीत धर्मांच्या माणसांना बरोबर घेऊन चालणारे होते म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व हे समतावादी होते. शिवाजी महाराजांचे राज्य हे रयतेचे गरिबांचे जनसामान्यांचे राज्य होते त्यांनी कधी भेदाभेद किंवा विषमता केली नाही. त्यांच्या राज्यकारभारात सर्व जाती-धर्माची माणसं होती त्यांच्या सैन्यात महत्त्वाच्या पदावर ही अनेक मुस्लीम होते. अंगरक्षककही मुस्लीम होते.

छत्रपती शिवाजी महाराज हे स्त्रियांचे पाठीराखे होते छत्रपती शिवाजी महाराज हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते. अठरापगड जातीतील लोकांना संघटीत करून समतेचे राज्य निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. कुळवाडी भूषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी सगळ्यात पहिल्यांदा राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांनी शोधून काढली. त्यावर त्यांनी चरित्र लिहिले व त्यांचा खरा इतिहास शोधून अभ्यास करून त्यांनी जगासमोर मांडून ' शिवजयंती 'ही सुरू केली. शिवरायांना महात्मा जोतिराव फुले गुरु मानत असत. छत्रपती शिवरायांच्या कार्याविषयी नरहर कुरुंदकर म्हणतात, "शिवाजी महाराज अष्टपैलू, अष्टावधानी ,थोर मानवतावादी व संपूर्ण पुरूष म्हणता येईल. असं प्रथमदर्शनी छाप पाडणारं मोठं प्रभावी व्यक्तिमत्व होतं.आदर्श राज्यकर्ता, थोर सेनानी ,प्रजादक्ष ,परधर्मसहिष्णू ,चारित्र्यसंपन्न दूरदृष्टीचा असा जाणता राजा जगाच्या इतिहासात दुसरा सापडणे कठीण. मुलगा ,पती, बाप, शिष्य इत्यादी संसारी नात्याने देखील घडणारे या महापुरूषाचे दर्शन मन भारून टाकते.राजे धार्मिक होते पण धर्मवेडे व धर्मभोळे नव्हते. व्यवहारी होते पण ध्येयशून्य नव्हते.साहसी होते पण आततायी नव्हते. त्यांना कठोर व्हायला लागत होतं. पण ते क्रूर नव्हते.ताठ नव्हते. नम्र होते. डौलदार होते. वैभव संपन्न अशी त्यांची राहणी असे.पण त्यात उधळमाधळ ,डामडौल नव्हता. कोणताही राजा महाराजांशी त्यांची तुलना करणे योग्य होणार नाही. कारण त्यांनी स्वतः शुन्यातून राज्य कमावले होते व इतराप्रमाणे त्यांना जनानखाना नव्हता. ते उपयोगितावादी असल्याने त्यांनी शोभेच्या डामडौलाच्या मोठमोठ्या इमारती उठविल्या नाहीत, तर आपला खजिना निरनिराळे किल्ले, जलदुर्ग, जहाजे बांधण्यात व त्यांच्या डागडुजीत, तसेच रयतेच्या कल्याणासाठी वापरला.त्यांनी सामान्य जनतेत स्वातंत्र्याची ,स्वराज्याची, राष्ट्रप्रेमाची ज्योत पेटवली, जी त्यांच्या निर्वाणानंतरही तेवत राहिली."भगवान आहिरे नावाचे कवी म्हणतात की," राजे तुम्ही दुश्मन वैऱ्याचे खरंच महाकाळ होता गनिमी धूर्त काव्यांचा पोलादी नांगर फाळ होतापण आमचं काय राजे, सीमेवरती रोज मृत्यू ,तरी शांततेचं भूत आहेतुमच्या सारखी राजे ,अहो आम्हाला कुठे पत आहे."या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आढावा घेऊन प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये वागणे महत्वाचे आहे.

आजचा तरुण हा दिशाहीन होत चालला आहे. शुरपणा हरवून बसत आहे. म्हणून अशानाही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची आठवण करून देणे गरजेचे आहे. प्रा. गौतम निकम यांनी संपादित केलेल्या 'शिवजागर' ग्रंथात गणेश पवार म्हणतात की, "जिजाऊंच्या प्रेरणेने व संस्काराने शिवरायांची जडणघडण अतिशय सुंदर झाली होती. थोरामोठ्यांचा आदर करणे, स्त्रियांची इज्जत राखणे, गुणी जणांचे कौतुक करणे, उद्दामपणाने वागणा-यांना वेळीच वठणीवर आणणे हे गुण शिवरायांच्या रोमारोमात भरून होते.धाडस, करारीपणा ,दूरदृष्टी, संघटन कौशल्य इत्यादी गुण तर शिवरायांकडे उपजतच होते."आजच्या तरुणांना दिशादर्शक ,मार्गदर्शक ठरणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तुत्व होते हे ध्यानात घ्यायला हवे. त्याप्रमाणे प्रत्येकाने त्याचे विचार अंगीकारायला हवेत.आज राजकारणामध्ये खरे तर छत्रपती शिवाजी महाराजांचे व इतर समाजसुधारकांचेही नावे घेतली जातात. केवळ फक्त ते मतापुरती आणि स्वार्थासाठी. त्यांचे नाव घेऊन समाजात विषमतेचे राजकारण केले जाते.

आजही छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवनेरी किल्ल्यावर गेल्यानंतर शासनाकडून ज्या मोठ्या प्रमाणावर सोयी सुविधा करायला हव्यात त्या केलेल्या दिसत नाहीत. केवळ राजकारणामध्ये उठता बसता त्यांचे नाव घेऊन चालत नाही तर त्यांचा इतिहास कसा प्रेरणादायी राहील त्यासाठी सतत प्रयत्न करायला हवेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य सर्व जातीतील माणसांसाठीचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे समतेचे,ममतेचे, मानवतेचे, निष्ठेचे, प्रामाणिकपणाचे, राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य केले नेमके त्यांच्या विरोधात आजच्या राजकारणात चित्र दिसून येते. राजकारण्याकडून त्यांच्या नावाचा वापर करून समाजाची दिशाभूल केली जात आहे. समाजातील तरुणांना फसवले जात आहे.त्यांचा खरा इतिहास, कार्य दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. आजही त्यांच्या नावाने खोट्या इतिहासाबाबतची गरळ ओकली जात आहे. म्हणून आजच्या कार्यकर्त्यांनी, तरुणांनी व विविध जाती धर्मातील सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास, खरे कार्य समजावून घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करायला हवी तरच निश्चितच स्वतःचे जिवन समृद्ध होईलच होईल परंतु समाज आणि देशही प्रगतीच्या पथावर सदोदित वाटचाल करत राहील हे नेहमी ध्यानात ठेवायला हवे.

**प्रा. डॉ. सतीश मस्के**
मराठी विभागप्रमुख,
कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय,
पिंपळनेर ता. साक्री, जि धुळे-४२४३०६
मो. ९४२३३९७४८४

# केंद्रिय अर्थसंकल्प हा सामान्य माणसाचा वार्षिक लेखाजोखा असतो - डॉ. केशव सोळंके




**जालना :** अर्थसंकल्प हा खऱ्या अर्थाने देशाने वर्षभर काय नवे करायचे त्यासाठी लागणारा खर्च कसा उभा करायचा याचा संकल्प असतो. हीच भूमिका एका कुटुंबातील सामान्य माणसाचा वार्षिक लेखाजोखा असतो, असे प्रतिपादन डॉ. केशव सोळंके यांनी केले.आज येथील श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात प्राध्यापक ज्ञान प्रबोधिनी या उपक्रमांतर्गत अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.केशव सोळंके बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर हे होते. यावेळी मंचावर प्राध्यापक प्रबोधिनी समितीच्या प्रमुख प्रा.पूजा अरोरा यांची विशेष उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. सोळंके म्हणाले की, समाजाचा सामाजिक व आर्थिक समतोल राखणारा अर्थसंकल्प म्हणून यावर्षीच्या अर्थसंकल्पाकडे पाहता येईल. यावेळी त्यांनी अर्थसंकल्पाची पार्श्वभूमी,नवीन कर प्रणाली, अर्थसंकल्प अंदाज, वित्तीय तूट, नवीन तरतुदी, अर्थसंकल्प मांडण्याची पद्धत इत्यादी बाबीवर विस्ताराने मांडणी केली. अर्थसंकल्प हा देशाच्या विकासाचा आत्मा असतो.

अर्थसंकल्पाची संकल्पना स्पष्ट करून तिचे उगमस्थान याचा इत्यभूंत इतिहास मांडला. देशाच्या संसदेत अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी मांडलेला अर्थसंकल्प वास्तववादी विचारावर आधारित आहे. मध्यमवर्ग हा अन्न ,वस्त्र,निवारा, आरोग्य व शिक्षण या मूलभूत बाबीसाठी संघर्ष करत असतो. त्यात तुम्ही आम्ही सर्वच जन आहोत. अर्थसंकल्पाचा परिणाम हा सामान्यांच्या जगण्यातील महागाई व सस्ताई याचा ताळेबंद असतो. असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर, प्रशासकिय अधिकारी व उपप्राचार्या डॉ.विद्या पटवारी मॅडम, "प्राध्यापक ज्ञान प्रबोधिनी" च्या प्रमुख प्रा.पूजा अरोरा,डॉ.जितेंद्र अहिरराव,डॉ. वासुदेव उगले डॉ.स्वाती महाजन,प्रा.साईलिला पारिक,डॉ.शेवतेकर प्रा.राहूल अंभोरे प्रा.सीमा गुप्ता,प्रा.शीला कवडे प्रा.प्रविण घुगे प्रा.चव्हाण व इतर कर्मचारी उपस्थित होते....